# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, उस्मानाबाद

## विद्यार्थ्यांच्या वसतिगृहासाठी भोजनालय व उपहारगृहाकरिता निविदा मागविणेबाबत

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून नव्यानेच कार्यान्वयीत होणाऱ्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, उस्मानाबाद येथे प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांना संस्थेच्या आवारातच भोजनालय व उपहारगृहाची सोय उपलब्ध करुन देणेकामी भोजनालय व उपहारगृहाकरीता संस्थास्तरावर खालीलप्रमाणे निवदा प्रक्रिया राबविण्यात येत आहे.

१) निविदा फॉर्म विक्री व जमा करावयाची तारीख 10 / 10 /२०२२ ते 17 /10 /२०२२ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत (कार्यालयीन वेळेत)

२) निविदा फॉर्म मिळण्याचे ठिकाण : अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, कोविड इमारत, जिल्हा सामान्य रुग्णालय आवार, उस्मानाबाद.

३) निविदा उघडण्याची तारीख 19 /10 /२०२२ सकाळी ठीक ११.३० वाजता

संस्थेचे संकेतस्थळ - http://gmcosmanabad.org

G. M. C., Osmanabad
Outward No. 800
Date 10/10/2022

Dean
Govt. Medical College,
Osmanabad

# भोजनालय व उपहारगृहाकरिता निविदा

उस्मानाबाद येथे नव्यानेच जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या आवारात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय कार्यान्वयीत झालेले असुन संलग्नित रुग्णालय म्हणून जिल्हा सामान्य रुग्णालय हे महाविद्यालयास हस्तांतरित करण्यात आलेले आहे. येथे प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांसाठी संस्थेच्या आवारात भोजनालय व उपहारगृह ११ महिन्याच्या कराराने भाडे तत्वावर चालविण्यासाठी मोहोरबंद निविदा मागविण्यात येत आहे.

सदरील निविदा फॉर्म शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, उस्मानाबाद येथील प्रशासकीय कार्यालयात रुपये ५००/- (रुपये पाचशे मात्र) रोखपाल शाखेत भरुन निविदा फॉर्म मिळेल. निविदा फॉर्म जमा करताना अनामत रक्कम रुपये ५०००/- (अक्षरी रुपये पाच हजार मात्र) रोखपाल शाखेत भरावी लागेल व सदर अनामत रकमेच्या पावतीची छायांकित प्रत निविदा प्रपत्रासोबत जोडावी लागेल. अनामत रक्कम रुपये ५०००/- (अक्षरी रुपये पाच हजार मात्र) भरल्याशिवाय निविदा फॉर्मचा विचार केला जाणार नाही.

भोजनालय व उपहारगृह चालविण्यासाठी कार्यालयाने घालून दिलेल्या अटी व शर्ती आपणावर बंधनकारक राहतील. सदरील अटी व शर्ती प्रपत्रासोबत उपलब्ध होतील. सदरील अटी व शर्ती मान्य असल्याबाबत निविदा धारकाचे हमीपत्र स्वतःच्या स्वाक्षरी व शिक्क्यासह असावे.

१) मोहोरबंद तांत्रिक लिफाफा क्र.०१ मध्ये खालील दिलेले कागदपत्र असणे आवश्यक असून जोडणे अनिवार्य आहे.

अ) शॉप ॲक्ट लायसन्स (अद्ययावत व वेळोवेळी नुतनीकरण केलेले असावे)
ब) फूड ॲण्ड ड्रग्स लायसन्स (अद्ययावत व वेळोवेळी नुतनीकरण केलेले असावे)
क) इन्कम टॅक्स विवरणपत्र (मागील तीन वर्षाचे)
ड) भोजनालय व उपहारगृह चालविण्याचे अनुभव प्रमाणपत्र असल्यास प्राधान्य
इ) पॅन कार्ड
ई) इ.एस.आय.सी. नोंदणी प्रमाणपत्र (आवश्यकतेनुसार)
उ) पी.एफ.नोंदणी प्रमाणपत्र (आवश्यकतेनुसार)
ऊ) जी.एस.टी. प्रमाणपत्र

२) मोहोरबंद लिफाफा क्र.०२ मध्ये देण्यात येणारे दुपारचे व रात्रीचे भोजन तसेच खाद्यपदार्थांचे दर भरुन देणे आवश्यक राहील.

सदरील मोहोरबंद निविदा तांत्रिक लिफाफा क्र.०१ व ०२ हे दिनांक 17 / 10 /२०२२ रोजी ठीक १७.०० वाजेपर्यंत आवक शाखेत जमा करण्यात यावे. तसेच सदर निविदा उघडण्याची तारीख आपणांस कळविण्यात येईल. सदर निविदा ही अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, उस्मानाबाद यांचे दालनात उघण्यात येईल. त्याप्रमाणे तांत्रिक लिफाफ्याची पूर्तता पुर्ण करणाऱ्या पुरेशा निविदा धारकांचा लिफाफा क्र.२ उघडण्याची कार्यवाही भोजनालय समिती ठरवेल त्यावेळी उघडण्यात येईल.

निविदा स्विकारण्याचे अगर नाकारण्याचे अधिकार मा. अधिष्ठाता यांनी राखून ठेवलेले आहेत.

Dean
Govt. Medical College,
Osmanabad

# निविदा प्रपत्र

श्री/श्रीमती_________________________________आपणांस विनंतीपूर्वक सादर करु इच्छितो/इच्छिते की, अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, उस्मानाबाद येथे प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांसाठी भोजनालय व उपहारगृह चालविण्यासाठी निविदा प्रपत्र सादर करीत आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | संपूर्ण नाव | |
| २ | अ) संपुर्ण स्थानिक पत्ता<br><br>संपर्कासाठी स्थानिक पत्ता | <br><br>१)<br><br>२) |
| | ब) कायम वास्तव्यास असलेला पत्ता | |
| ३ | सध्या करित असलेला व्यवसाय सरकारी तत्वावर असल्यास नोंदणी क्रमांकासह सविस्तर माहिती द्यावी. | |
| ४ | आपणांस ओळखत असलेल्या दोन प्रतिष्ठित व्यक्तींच्या स्वाक्षऱ्या (शिक्क्याची स्वाक्षरी स्विकारली जाणार नाही) | १) संपूर्ण नाव :-<br>पत्ता :-<br><br>सही व दुरध्वनी क्रमांक<br><br>१) संपूर्ण नाव :-<br>पत्ता :-<br><br>सही व दुरध्वनी क्रमांक |
| ५ | या निविदा फॉर्म सोबत मी चौकटीत ( ) अशी खुण केलेली कागदपत्रे जोडलेली आहेत.<br>अ) शॉप ॲक्ट लायसन्स (अद्ययावत व वेळोवेळी नुतनीकरण केलेले असावे)<br>ब) फूड ॲण्ड ड्रग्ज लायसन्स (अद्यावत व वेळोवेळी नुतनीकरण केलेले असावे)<br>क) इन्क्म टॅक्स विवरणपत्र (मागील तीन वर्षांचे)<br>ड) भोजनालय व उपहारगृह चालविण्याचे अनुभव प्रमाणपत्र असल्यास प्राधान्य<br>इ) पॅन कार्ड<br>ई) इ.एस.आय.सी. नोंदणी प्रमाणपत्र (आवश्यकतेनुसार)<br>उ) पी.एफ.नोंदणी प्रमाणपत्र (आवश्यकतेनुसार)<br>ऊ) जी.एस.टी. प्रमाणपत्र | |

मी असे लिहुन देतो/देते की, आपल्या परिशिष्ट मधील सर्व अटी व शर्ती मी वाचलेल्या आहेत व त्या मला मान्य असून बंधनकारक आहेत.

निविदाधारकाची स्वाक्षरी-------------------------------

निविदाधारकाचे नाव-----------------------------------

Dean
Govt. Medical College,
Osmanabad

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, उस्मानाबाद

## अटी व शर्ती बाबतचे परिशिष्ट

उस्मानाबाद येथे नव्यानेच जिल्हा सामान्य रुग्णालय, उस्मानाबाद यांचे आवारात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय कार्यान्वयीत झालेले असुन संलग्नित रुग्णालय म्हणून जिल्हा सामान्य रुग्णालय हे महाविद्यालयास हस्तांतरित करण्यात आलेले आहे. येथे प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांसाठी रुग्णालय आवारात भोजनालय व उपहारगृह चालविण्यासाठी अटी व शर्ती खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | अटी व शर्ती |
|---|---|
| १. | सदर भोजनालय व उपहारगृह हे फक्त या महाविद्यालयात प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांसाठी चालवावयाचे आहे. |
| २. | भोजनालय व उपहारगृहासाठी वापरण्यात येणार खाद्यपदार्थ सर्व प्रकारच्या भाजी, डाळी, कडधान्ये, तेल, तुप व इतर खाद्यपदार्थ उत्तम प्रतीची असावीत भोजनालय व उपहारगृहात चांगल्या प्रतीचे भोजन तयार करावे. तो अधिकाऱ्यांकडून अचानकपणे तपासला जाईल. भोजनाच्या पदार्थांचा दर्जा व गुणवत्तेच्या बाबतीत तक्रारी प्राप्त झाल्यास त्याची गंभीर दखल घेतली जाईल. |
| ३. | भोजनालय व उपहारगृहासाठी या कार्यालयाकडून फक्त जागा उपलब्ध करुन दिली जाईल. काही किरकोळ बदल करावयाचे असल्यास कार्यालयाची परवानगी घेणे बंधनकारक राहील. |
| ४. | भोजनालय हे दुपारचे जेवणासाठी दु.१२.०० ते ३.०० या वेळेत सुरू ठेवावे आणि रात्रीचे जेवणासाठी रात्री ०७.०० ते १०.३० पर्यंत सुरु ठेवावे. तसेच उपहारगृह हे सकाळी ०७.०० ते १०.०० व दुपारी ०३.०० ते ५.०० या वेळेत सुरु ठेवावे. |
| ५. | भोजनालय व उपहारगृहाची सुरक्षा व्यवस्था ही भोजनालय चालकाने स्वत: ठेवावी. |
| ६. | भोजलालय व उपहारगृहात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची नियमीत किमान ३ महिन्यातून एकदा आरोग्य तपासणी करुन त्याचा अहवाल वेळोवेळी प्रशासनास सादर करणे बंधनकारक आहे. |
| ७. | भोजनालय व उपहारगृहात बसण्यासाठीची व्यवस्था उदा. टेबल, खुर्ची व इतर फर्निचर भोजनालय चालकाने स्वत्: करावी. |
| ८. | भोजनालय व उपहारगृहासाठी लागणारा विद्युत पुरवठा कार्यालयाकडुन उपलब्ध करुन दिला जाईल, परंतु भोजनालय चालकाला स्वखर्चाने सबमिटरचा खर्च करावा लागेल व वापरलेल्या विजेचा खर्च हा सबमिटरप्रमाणे या कार्यालयाच्या रोखपाल शाखेकडे दरमहा १० तारखेपर्यंत/ तत्पुर्वी भरणा करावा लागेल. विज बील उशीराने भरल्यास त्यास नियमाप्रमाणे दंड आकारला जाईल. |
| ९. | भोजनालय व उपहारगृहासाठी पुरविण्यात येणाऱ्या पाण्याचे देयक आपणांस कार्यालयाच्या रोखपाल शाखेकडे दरमहा १० तारखेपर्यंत/ तत्पुर्वी भरणा करावा लागेल. |
| १०. | भोजलालय व उपहारगृहासाठी तयार केलेले अन्न/ खाद्य पदार्थ हे उघडे ठेवण्यात येऊ नये व पदार्थाच दर्जा व गुणवत्ता राखणे तसेच स्वच्छता राखण्याची जबाबदारी भोजनालय चालकावर बंधनकारक राहील. |
| ११. | भोजनालय व उपहारगृहासाठी लागणारी सर्व प्रकारची भांडी, गॅस तसेच इतर साहित्य आणण्याची जबाबदारी भोजनालय चालकावरच राहील. |
| १२. | भोजनालय व उपहारगृह चालविताना आपणांस भोजनालयामध्ये अग्निशामक उपकरणे स्वखर्चाने ठेवावी व हाताळावी लागतील. |
| १३. | आपण चालविणार असलेले भोजनालय हे अन्न व औषध प्रशासन विभागाने घालून दिलेल्या प्रम[illegible] असावे. |
| १४. | भोजनालय व उपहारगृहात काम करणारे कामगार ठेवणे व त्यांचा पगार देणे याची सर्वस्वी [illegible] भोजनालय चालकाची राहील. कामगारांचे वय १८ वर्षे व त्यापेक्षा जास्त असावे, कमी वयाचे अथवा बालकामगार असु नयेत. |
| १५. | भोजनालय व उपहारगृहातुन विद्यार्थ्यांसाठी पुरविण्यात येणाऱ्या खाद्यपर्थांचे उधारीचे पैसे वसुल करण्याची जबाबदारी ही भोजनालय चालकाची राहील. |

Dean
Govt. Medical College,
Osmanabad

| | |
|---|---|
| १६. | आपणांस सदरचे भोजनालय व इमारतींमध्ये पोटभाडेकरु ठेवता येणार नाहीत. |
| १७. | सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्याने ठरविल्याप्रमाणे भोजनालय व उपहारगृहासाठी जागेचे भाडे, विद्युत पुरवठयाची देयके, पाणीपट्टी देयके भोजनालय चालकाने व कार्यालयाच्या रोखापाल शाखेकडे दरमहा १० तारखेच्या आत भरावीत. |
| १८. | भोजनालय व उपहारगृह चालकास रु.२५०००/- (अक्षरी- रुपये पंचवीस हजार मात्र) इतकी अनामत रक्कम ठेवावी लागेल व त्याची पावती रोखापाल यांचेकडुन प्राप्त करुन घ्यावी. ११ महिन्याच्या कराराच्या कालावधीत आपणांकडुन इमारतीचे नुकसान झाल्यास, तोडफोड झाल्यास किंवा आपणांकडे काही देणे बाकी असल्यास सदरील अनामत रकमेतून ते वसूल करण्यात येईल. कराराची मुदत संपण्यापुर्वी भोजनालय व उपहारगृह बंद केल्यास अनामत रक्कम जप्त करण्यात येईल. |
| १९. | भोजनालय चालकास रु.१००/- स्टॅम्प पेपरवर ११ महिन्याचा करारनामा करुन घ्यावा लागेल. ११ महिन्याच्या कालावधीनंतर हा करारनामा आपोआप संपुष्टात येईल. |
| २०. | खाद्यपदार्थाचा दर्जा समाधानकारक असल्यास स्वच्छता व इतर बाबींची पुर्तता केल्यास ११ महिन्याचा कालावधी पुढे चालु ठेवण्याचा अधिकार अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, उस्मानाबाद यांनी राखुन ठेवलेला आहे. |
| २१. | भोजनालय व उपहारगृह कोणत्याही क्षणी बंद करणे/ किंवा कोणतेही कारण न देता करार रद्द करणे याबाबतचे सर्व अधिकार मा. अधिष्ठाता यांनी राखुन ठेवलेले आहेत. |
| २२. | निविदा फॉर्म् घेताना रु.५०००/- मात्र निविदा अनामत रक्कम भरावी लागेल. |
| २३. | भोजनालयातील कर्मचाऱ्यांची वेळोवेळी शारिरिक तपासणी करुन घ्यावी. अन्न व औषध प्रशासन विभागाचे प्रमाणपत्र, शॉप ॲक्ट असल्यास भोजनालय व उपहारगृह चालविण्याचे अनुभव प्रमाणपत्र संस्था नोंदणी प्रमाणपत्र आवश्यक आहे. |
| २४. | भोजनालय व उपहारगृहात आहार पुरविताना उत्तम दर्जा राखणे, अन्नातुन विषबाधा झाल्यास/ जीवितहानी अपाय झाल्यास त्यास संबंधित भोजनालय चालक जबाबदार राहिल याची नोंद घ्यावी. |
| २५. | भोजनालय व उपहारगृहात कोणतीही दुर्घटना झाल्यास व भोजनालयातील कर्मचाऱ्यास दुखापत/ मृत्यु झाल्यास सदरची नुकसान भरपाई मोबदला देण्याची सर्वस्वी जबाबदारी ही भोजनालय चालकाची राहील. त्याचप्रमाणे सदर प्रकरणी न्यायप्रविष्टं बाबी अथवा वाद निर्माण झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी भोजनालय चालकाची राहील. त्या अनुषंगाने नियमानुसार भोजनालयात कार्यरत सर्व कर्मचारी यांची योग्य ते इन्शुरन्सची (विमा) जबाबदारी ही भोजनालय चालकाची राहील. याबाबत शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, उस्मानाबाद कोणतीही जबाबदारी घेणार नाही यांची नोंद घ्यावी. |
| २६. | निविदेमध्ये जो आहार जाहिर करण्यात आलेला आहे तोच आहार देणेबाबत निविदाधारकाने दक्षता घ्यावी. |

(डॉ. संजय मा. राठोड),
अधिष्ठाता
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, उस्मानाबाद

वरीप्रमाणे निविदा प्रपत्रातील सर्व अटी शर्ती मला मान्य असुन त्या माझ्यावर बंधनकारक राहतील, त्याबाबत मी खालील स्वाक्षरी करुन सादर करीत आहे.

निविदाधारकांची स्वाक्षरी, नाव व पत्ता: ------------------------------------------

------------------------------------------

दिनांक:-

## भोजनालय व उपहारगृहाच्या जागेबद्दल दरमहा भरावयाचे भाडे

मी श्री/श्रीमती____________________________________आपणांस विनंतीपूर्वक सादर करु इच्छितो/इच्छिते की, अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, उस्मानाबाद, जिल्हा सामान्य रुग्णालय आवार, उस्मानाबाद येथील आवारातील______________________इमारतीमध्ये महाविद्यालयात प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी भोजनालय व उपहारगृह चालविण्यासाठी निविदा प्रपत्र सादर करीत आहे.

१) संपुर्ण नाव :-____________________________________

२) संपुर्ण स्थानिक पत्ता :-____________________________________

३) संपर्कासाठी दुरध्वनी क्रमांक :- १) _____________ २) _______________

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, उस्मानाबाद, आवारातील __________________ इमारत येथे उपलब्ध करुन दिलेल्या जागेच्या मोबदल्यात मी शासनास खालीलप्रमाणे भाडे दरमहा भरण्यास तयार आहे.

जागेबद्दलचे भाडे दरमहा रुपये-
(अक्षरी रुपये____________________________)

मी असे लिहून देतो/देते की, वरीलप्रमाणे मी लिहून दिलेले दरमहाचे भाडे किंवा सार्वजनिक बांधकाम विभागाने ठरवून दिलेले भाडे यापैकी जे अधिक असेल ते मी दरमहा कार्यालयाच्या रोखपाल शाखेत भरण्यास बांधिल राहिल. दरमहाचे भाडे थकल्यास किंवा न भरल्यास अधिष्ठाता किंवा त्याचे प्रतिनिधी भोजनालय व उपहारगृह तात्काळ बंद करतील याची मला जाणीव आहे.

निविदा धारकाची स्वाक्षरी ________________________

निविदा धारकाचे संपुर्ण नाव ________________________

Dean
Govt. Medical College,
Osmanabad

(सूचना ६ हे प्रपत्र पुर्ण भरुन लिफाफा क्र.२ मध्ये सिलबंद करुन टाकावे)

भोजनालयात पुरविण्यात येणारे दुपारचे व रात्रीचे जेवणाचे दर खालीलप्रमाणे

| अ.क्र. | तपशिल | जेवणातील पदार्थ | दर |
|---|---|---|---|
| १ | दुपारचे जेवण | वरण/ भात, चपाती/ पोळी, सुकी भाजी, दाळ, पातळ भाजी, दही, पापड, लोणचं, कांदा/मुळा/टोमॅटो/गाजर, लिंबु, मीठ | |
| २ | रात्रीचे जेवण | वरण/ भात/ खिचडी, चपाती/ पोळी, सुकी भाजी, दाळ, पातळ भाजी, दही, पापड, लोणचं, कांदा/मुळा/टोमॅटो/गाजर, लिंबु, मीठ | |
| | टीप १) शाकाहारी जेवण करणाऱ्यांना दर रविवारी रोजच्या जेवणाव्यतिरीक्त स्वीट देणे (रात्री)<br>२ मांसाहारी जेवण करणाऱ्यांना दर रविवारी मटन/ चिकन/ अंडाकरी थाळी देणे (रात्री) | | |

(डॉ. संजय मा. राठोड),
अधिष्ठाता
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, उस्मानाबाद

(सूचना § हे प्रपत्र पुर्ण भरुन लिफाफा क्र.२ मध्ये सिलबंद करुन टाकावे)

## विद्यार्थ्यांकरिता उपहारगृहात पुरविण्यात येणारे खाद्यपदार्थांचे दर खालीलप्रमाणे

| अ.क्र. | पदार्थाचे नाव | दर | |
|---|---|---|---|
| | | रुपये | पैसे |
| १ | मिसळ प्लेट पावसह | | |
| २ | बटाटे वडा २ नग सांबरसह | | |
| ३ | मेदूवडा २ नग सांबरसह | | |
| ४ | इडली २ नग सांबरसह | | |
| ५ | समोसा १ नग | | |
| ६ | कचोरी २ नग | | |
| ७ | खमण ढोकळा प्लेट (२५० ग्रॅम) | | |
| ८ | सिंगल अंडा ऑम्लेट प्लेट (पावसह) | | |
| ९ | डबल अंडा ऑम्लेट प्लेट (पावसह) | | |
| १० | सिंगल अंडा भुर्जी (पावसह) | | |
| ११ | पोहे प्लेट (२५० ग्रॅम) | | |
| १२ | आलू पराठा १ नग (२५० ग्रॅम) | | |
| १३ | चहा साधा | | |
| १४ | चहा स्पेशल | | |
| १५ | कॉफी (साधी) | | |
| १६ | नेसकॉफी | | |
| १७ | गरम दुध ग्लास (साखरेसह) | | |

(डॉ. संजय मा. राठोड),
अधिष्ठाता
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, उस्मानाबाद